# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः21.08.2025** **वारःगुरुवार**

---

• राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार सी पी राधाकृष्णन यांचा उमेदवारी अर्ज दाखल

•भारत आणि युरेशियन व्यापारी संघटना यांच्यात मुक्त व्यापार करारासाठी संदर्भ अटीच्या मसुद्यावर स्वाक्षरी

•कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकण्डक्टींग आणि सिलिकॉम क्षेत्रात आवश्यक मनुष्यबळाच्या जोरावर आपण वर्चस्व गाजवू शकतो, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास

•आगामी पुरुष आशिया करंडकासाठी १८ सदस्यीय भारतीय पुरुष संघाची हॉकी इंडियाची घोषणा.

आणि

•येत्या दोन-तीन दिवसात महाराष्ट्र, गुजरात आणि देशाच्या ईशान्य भागात अति मुसळधार पाऊस पडण्याचा हवामान विभागाचा इशारा.

राधाकृष्णन

राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार, विद्यमान महाराष्ट्राचे राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी काल आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रीय मंत्रिमंडळातले सदस्य उपस्थित होते. राधाकृष्णन हे एक यशस्वी उपराष्ट्रपती ठरतील आणि देशाच्या प्रगतीला त्यांचा मोठा हातभार लागेल असा विश्वास मोदी यांनी समाज माध्यमावरील संदेशात व्यक्त केला आहे.

रशिया

रशिया आणि भारतानं परस्पर हितसंबंध जपत सातत्यानं सहकार्य करण्याचे मार्ग शोधले आहेत असं मत भारतातील रशियन दूतावासाचे अधिकारी रोमन बाबुश्किन यांनी व्यक्त केलं. ते काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलत होते. दोन्ही देशांमधील संबंध विस्तारत असल्याचं सांगत वैविध्यपूर्ण परराष्ट्र धोरणासह भारत एक अग्रगण्य आर्थिक शक्ती असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.परराष्ट्र मंत्री डॉ.एस.जयशंकर यांच्या मॉस्को भेटीसह या वर्षाच्या अखेरीस रशियाचे राष्ट्रपती पुतिन यांच्या भारत भेटीसाठी पायाभूत तयारी सुरू असल्याचंही बाबुश्किन यांनी सांगितलं.

जयशंकर

भारत आणि रशियामधील धोरणात्मक भागीदारी मजबूत करण्याच्या उद्देशानं परराष्ट्र मंत्री डॉ. एस जयशंकर मॉस्को इथं आज रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्गेई लावरोव्ह यांची भेट घेणार आहेत. या भेटीत द्विपक्षीय, प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर चर्चा होणार असून यावेळी कृषी,विज्ञान-तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधा सहकार्यातील प्रगतीचा आढावा देखील घेण्यात येईल.

युरेशियनइकॉनॉमिकयुनियन

भारत आणि युरेशियन व्यापारी संघटना यांनी मुक्त व्यापार करारावर वाटाघाटी सुरू करण्यासाठी संदर्भ अटीच्या मसुद्यावर स्वाक्षरी केली आहे. वाणिज्य विभागाचे अतिरिक्त सचिव अजय भादू आणि युरेशियन आर्थिक आयोगाचे व्यापार धोरण विभागाचे उपसंचालक मिखाईल चेरेकाएव यांनी मॉस्को इथं या करारावर स्वाक्षरी केली. या प्रस्तावित मुक्त व्यापार करारामुळे निर्यातीला तसंच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना चालना मिळेल, असं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं एका निवेदनात म्हटलं आहे. युरेशियन व्यापारी संघटनेमध्ये रशियासह आर्मेनिया, बेलारूस, कझाकस्तान, किर्गिझस्तान यांचा समावेश आहे.

आधार-स्टारलिंक

भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणानं आधार आधारित ग्राहक पडताळणीसाठी स्टारलिंक या खाजगी उपग्रह आधारित इंटरनेट सेवा प्रदात्यासोबत सहकार्य केलं आहे. यामुळे पारदर्शकता आणि जबाबदारी सुनिश्चित करताना आधार सेवा वितरणात सक्षमता येईल, तसंच आधार प्रमाणीकरणाचा वापर देशाच्या डिजिटल पायाभूत सुविधा सक्षम करण्यासाठी होईल, असं इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं एका निवेदनात म्हटलं आहे.

एमकेसीएल

भविष्यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकण्डक्टींग आणि सिलिकॉम या तीनही तंत्रज्ञानामध्ये आवश्यक असणारं मनुष्यबळ आपल्याकडे भरपूर असून ते बळकट करण्याचं काम केलं तर या तीनही क्षेत्रात आपण वर्चस्व गाजवू शकतो असं मत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पुण्यात व्यक्त केलं. एमकेसीएल म्हणजे महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्या रौप्य महोत्सवी स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे आणि एमकेसीएलचे अध्यक्ष डॉक्टर अनिल काकोडकर, संस्थापक डॉक्टर विजय भटकर इत्यादि मान्यवर उपस्थित होते.

सद्भावना दिन

दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांच्या ८१व्या जयंतीदिनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल त्यांना आदरांजली वाहिली. राजीव गांधी यांची जयंती ‘सद्भावना दिन’ म्हणून साजरी करण्यात येते. मुंबईत,मंत्रालयात महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. राजभवनातही राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन करण्यात आलं.

विधेयक

IIM, अर्थात भारतीय व्यवस्थापन संस्था सुधारणा विधेयकाला संसदेची मंजुरी मिळाली आहे. लोकसभेत हे विधेयक आधीच मंजूर झालं होतं. राज्यसभेतही काल त्याला मंजुरी देण्यात आली. बिहारमधल्या मतदार याद्यांच्या पुनरीक्षणासह विविध
मुद्द्यांवर विरोधकांनी संसदेच्या दोन्ही सभागृहात गदारोळ केल्यामुळं कामकाज वारंवार, आणि शेवटी दिवसभरासाठी स्थगित करण्यात आलं.

गेमिंग विधेयक

लोकसभेत इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ऑनलाईन सट्टेबाजीवर निर्बंध घालणारं, गेमिंगचा प्रचार आणि नियमन विधेयक लोकसभेत काल मांडलं. ते आवाजी मतदानानं ते मंजूर करण्यात आलं  ई-स्पोर्ट्स, शैक्षणिक आणि सामाजिक गेम्स यासह ऑनलाइन गेमिंग क्षेत्राला चालना देण्याबरोबरच त्यावर नियमन आणणं, हा या विधेयकाचा उद्देश आहे. कोणत्याही प्रकारे ऑनलाईन गेम्सद्वारे सेवा, जाहिरातींच्या रूपाने आर्थिक व्यवहारांवर पूर्ण बंदीची तरतूद या विधेयकात आहे. या विधेयकात तीन वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि एक कोटी रुपये दंड किंवा दोन्ही अशा शिक्षेची तरतूद आहे.

कैलासयात्रा

जम्मू आणि काश्मीरमध्ये, तीन दिवसांच्या वार्षिक पवित्र कैलास यात्रेसाठीचा चारी मुबारक भादरवाह इथल्या प्राचीन वासुकी नाग मंदिर गाथा इथून कैलास कुंडाकडे काल रवाना झाला. अलिकडच्या ढगफुटीच्या घटना आणि या प्रदेशातील प्रतिकूल हवामानाच्या पार्श्वभूमीवर खबरदारीचा उपाय म्हणून केवळ मर्यादित यात्रेकरूनाच यात्रेत सहभागी होण्याची परवानगी देण्यात आली आहे. ही यात्रा २२ ऑगस्ट रोजी भादरवाहला परतीच्या प्रवासाला सुरुवात करेल. यात्रा सुरळीत पार पडावी यासाठी स्थानिक प्रशासनाने वैद्यकीय पथके तैनात करण्यासह यात्रा मार्गावर विस्तृत व्यवस्था केली आहे.

पाऊस

महाराष्ट्र राज्यात ९ ऑगस्टपासून आतापर्यंत १९ जिल्ह्यातील १८७ तालुक्यांमध्ये अतिवृष्टी झाली आहे. या काळात ८ लाखांपेक्षा जास्त हेक्टरवरील पिकांचं नुकसान झालं आहे. अतिवृष्टीमुळं झालेल्या नुकसानाचे पंचनामे तातडीने पूर्ण करून, जिल्हा प्रशासनानं तत्काळ उपाययोजना करून पीडित शेतकऱ्यांना दिलासा देण्याचं काम करावं. एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये, असे निर्देश राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी कृषी आणि महसूल विभागाला दिले आहेत.बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यानं राज्यात गेला आठवडाभर मुसळधार पाऊस पडत आहे. शेतीच्या नुकसानाचे तातडीनं पंचनामे करुन एनडीआरएफच्या निकषांप्रमाणे भरपाई देण्याबाबत कार्यवाहीचे निर्देश महाराष्ट्र राज्याचे मुख्यंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारीच दिले आहेत.

आता क्रिडाविषयक बातम्या

बल्गेरियात 20 वर्षांखालील जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय कुस्तीपटू तपस्यानं 57 किलो वजन गटामध्ये देशाला पहिलं सुवर्णपदक जिंकून दिलं.

जम्मू आणि काश्मीरमधील निसर्गरम्य दल सरोवरामध्ये पहिल्या खेलो इंडिया जल क्रीडा महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. तीन दिवसांच्या या स्पर्धेत ३६ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधील ४०० हून अधिक खेळाडू रोइंग, कयाकिंग आणि कॅनोइंगमध्ये २४ सुवर्णपदकांसाठी स्पर्धा करतील.

हॉकी

हॉकी इंडियानं आगामी पुरुष आशिया करंडकसाठी १८ सदस्यीय भारतीय पुरुष संघाची घोषणा केली आहे. बिहारमधील राजगीर इथं येत्या २९ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर दरम्यान या स्पर्धा होणार आहे. भारताला जपान, चीन आणि कझाकस्तानसह अ गटामध्ये स्थान देण्यात आलं असून भारतीय संघ २९ ऑगस्टला चीनविरुद्ध सलामीचा सामना खेळेल. तर ३१ ऑगस्टला जपान आणि १ सप्टेंबरला कझाकस्तानविरुद्ध भारतीय पुरुष संघाचा सामना होईल. ही स्पर्धा बेल्जियम आणि नेदरलँड्समध्ये होणाऱ्या FIH हॉकी विश्वचषक २०२६ साठी पात्रता म्हणून ओळखली जाते.

हवामान

भारतीय हवामान विभागानं आज गुजरातमध्ये अति मुसळधार पावसाचा इशारा जारी केला आहे. आज सौराष्ट्र आणि कच्छमध्ये मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असल्याचं म्हटलं आहे. येत्या दोन तीन दिवसांत महाराष्ट्र आणि देशाच्या ईशान्य भागात काही ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असून उद्यापर्यंत बिहार, छत्तीसगड, राजस्थान, झारखंड, मध्य प्रदेश, ओडिशा, उत्तराखंड, कोकण आणि गोव्यातही मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. तसंच येत्या तीन दिवसांत जम्मू-काश्मीर, लडाख, गिलगिट, बाल्टिस्तान, मुझफ्फराबाद, बिहार, झारखंड, ओडिशा, तेलंगण, पश्चिम बंगाल आणि सिक्कीममध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ आणि सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता आहे,असं हवामान विभागानं सांगितलं आहे.

या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.